**अनुसूचित क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा)**
**महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग**
**जिल्हा परिषद औरंगाबाद**
**जिल्हा परिषद, औरंगाबाद अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात**
**जाहिरात क्रमांक:- ०१/२०१९ दिनांक :- ०६/०३/२०१९**

------------------------------

महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक संकिर्ण -२०१८/ प्र. क्र.२०/ आ.पु.क. दिनांक १६ मे २०१८, व वित्त विभागाकडील शासन परिपत्रक दिनांक २८ डिसेंबर, २०१८, महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२१६/(प्र. क्र.६५/ १६)/ १३-अ दिनांक १३ जुन २०१८, महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग यांचे शासन निर्णय क्र. संकीर्ण-५०१६/ प्र.क्र.३२१/आस्था-८ दिनांक २३ जुलै २०१८ व शासन शुध्दीपत्रक दिनांक १३ फेब्रुवारी, २०१९, ग्राम विकास विभाग यांचे पत्र क्र. संकीर्ण-२५१७/प्र.क्र.२४१/आस्था-८ दिनांक ०३ डिसेंबर २०१८,महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक बीसीसी२०१८/प्र.कै.५८१ए/ २०१८/१६-ब दिनांक ०५ डिसेंबर २०१८ आणि महाराष्ट्र शासन वित्त विभाग यांचे शुध्दीपत्रक क्रमांक - संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२०/आ.पु.क दिनांक ७ डिसेंबर २०१८ सामान्य प्रशासन विभागाचे शासन शुध्दीपत्रक क्र. संकीर्ण-१११८/ प्रक्र३९/१६-अ, दिनांक १९ डिसेंबर २०१८, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्र.बीसीसी २०१८/ प्र.क्र.५८१ए/ २०१८/१६-ब, दिनांक १९ डिसेंबर २०१८, ग्राम विकास विभागाकडील पत्र क्र. संकीर्ण/ २०१८/ प्रक्र२४११/ आस्था-८, दिनांक ३१ डिसेंबर २०१८ व ०१ जानेवारी २०१९ तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (EWS) वर्गातील उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक राआधो-४०९/ प्र.क्र.३१/ १६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी २०१९ व सामान्य प्रशासन विभागाकडील शासन शुध्दीपत्रक क्रमांक बीसीसी २०१८/ प्र.क्र.५८१ए/ २०१८/ १६-ब, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१९ अन्वये विहित तरतुदी आणि निर्देशानुसार जिल्हा परिषद **औरंगाबाद** अंतर्गत विविध विभागाकडील सरळसेवेने भरावयाच्या माहे डिसेंबर २०१९ अखेर संभाव्य रिक्त होणाऱ्या गट-क संवर्गातील पदांचे भरती करीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. खाली नमुद केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे विहित अर्हताधारक पात्र उमेदवारांनी www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर आपले अर्ज सादर करावेत.

जिल्हा अंतर्गत गट "क" चे खालील नमूद केलेप्रमाणे सरळसेवेने भरावयाच्या पदांकरीता अर्हता प्राप्त पात्र उमेदवारांकडून विहित नमुन्यात फक्त ऑनलाईन पध्दतीनेच महापरीक्षा पोर्टल यांचे www.mahapariksha.gov.in या संकेत स्थळावर अधिकृत अर्ज मागविण्यात येत आहेत. पदभरतीसाठी पदनिहाय सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षणाचे तपशिल खालील विवरणपत्रात नमूद केलेप्रमाणे आहेत.

➢ **<u>अर्ज करण्याची पध्दत</u>**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रस्तुत परीक्षे करीता फक्त ऑनलाईन पध्दतीने अर्ज स्विकारण्यात येतील. | |
| २ | पात्र उमेदवारांना वेब आधारित (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळाव्दारे या कालावधीतच करणे आवश्यक राहिल. | |
| ३ | सर्व पदांकरीता ऑनलाईन अर्ज स्विकारण्याचा दिनांक- दि.२६/०३/२०१९ रोजी रात्री १०.०० वाजेपासुन | |
| ४ | सर्व पदांकरीता ऑनलाईन अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक - दि.१६/०४/२०१९ रोजी मध्यरात्री ११.५९ वाजेपर्यंत | |

➢ **<u>परीक्षा शुल्क</u>**

| | | |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | रु.२५०/- |
| २ | सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवार | रु.५००/- |
| ३ | माजी सैनिक उमेदवारांसाठी परीक्षा शुल्क भरण्याची आवश्यक्ता नाही. | |

सरळसेवा भरती प्रक्रिया संदर्भातील सविस्तर जाहिरात www.mahapariksha.gov.in व www.aurangabadzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून उमेदवारांनी जाहिरातीत नमुद संपुर्ण माहिती काळजीपुर्वक वाचून ऑनलाईन (online) पध्दतीनेच www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर आपले अर्ज सादर करावेत. सदर संकेतस्थळाला भरतीप्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेसंबंधी आवश्यक अद्यावत माहिती प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

भरती प्रक्रिया/परीक्षा स्थगित करणे किंवा रद्य करणे, परीक्षेचा प्रकार,(सामाजिक अथवा समांतर आरक्षणात अंशत:/पुर्णत: बदल करणे, संवर्गनिहाय एकूण रिक्त पदांच्या संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार तसेच भरती प्रक्रिया संदर्भात वाद, तक्रारी बाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकरण तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद **औरंगाबाद** यांना असतील. अनुकंपा पदभरती, ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांमधुन १० टक्के नामनिर्देशनाने करावयाची भरती अथवा इतर कोणत्याही प्रशासकिय कारणांमुळे जाहिरातीत नमुद पदे कमी किंवा जास्त होऊ शकतात. त्याबाबत उमेदवारास अथवा इतर कोणासही कोणताही दावा करता येणार नाही.

➢ **जिल्हा परिषद औरंगाबाद अंतर्गत सरळसेवा भरती २०१९ अन्वये भरावयाच्या पदांची नावे, रिक्त पद संख्या, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार पदांचा एकत्रित तपशिल खालील प्रमाणे आहे.**

**अनुसूचित क्षेत्राबाहेरील (बिगर पेसा)**

**१) कनिष्ठ अभियंता (स्थापत्य)**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | २ | ३ | २ | १ | - | - | ५ | - | ३ | - | - | १६ |
| **सर्वसाधारण** | १ | २ | १ | १ | - | - | २ | - | २ | - | - | ९ |
| **महिला** | १ | १ | १ | - | - | - | १ | - | १ | - | - | ५ |
| **माजी सैनिक** | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | - | १ |
| **अंशकालीन** | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | - | १ |
| एकूण | २ | ३ | २ | १ | - | - | ५ | - | ३ | - | - | १६ |

**२) कंत्राटी ग्रामसेवक**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | - | २ | - | - | - | - | - | - | ५ | ३ | ४ | १४ |
| **सर्वसाधारण** | - | १ | - | - | - | - | - | - | २ | २ | ४ | ९ |
| **महिला** | - | १ | - | - | - | - | - | - | १ | १ | - | ३ |
| **माजी सैनिक** | - | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ |
| **अंशकालीन** | - | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ |
| एकूण | - | २ | - | - | - | - | - | - | ५ | ३ | ४ | १४ |
| **अपंग** | रिक्त १४ पैकी ४ पदे दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव आहे. (एका पायाने दिव्यांग-१, कर्णबधीर-३) | | | | | | | | | | | ४ |

### ३) औषध निर्माता

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | १ | २ | - | १ | - | - | - | - | १ | १ | २ | ८ |
| **सर्वसाधारण** | १ | १ | - | १ | - | - | - | - | १ | १ | १ | ६ |
| **महिला** | - | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ | २ |
| एकूण | १ | २ | - | १ | - | - | - | - | १ | १ | २ | ८ |

### ४) प्रयोगशाळा तंत्रज्ञ

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | - | - | - | - | - | - | १ | - | १ | - | - | २ |
| **सर्वसाधारण** | - | - | - | - | - | - | १ | - | १ | - | - | २ |
| एकूण | - | - | - | - | - | - | १ | - | १ | - | - | २ |

### ५अ) आरोग्य सेवक (पुरुष)

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | - | - | - | - | - | १ | - | २ | ४ | २ | १ | १० |
| **सर्वसाधारण** | - | - | - | - | - | १ | - | २ | ३ | २ | १ | ९ |
| **माजी सैनिक** | - | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ |
| एकूण | - | - | - | - | - | १ | - | २ | ४ | २ | १ | १० |
| **दिव्यांग** | रिक्त १० पैकी १ पद एका पायाने दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव आहे. | | | | | | | | | | | १ |

### ५ब) आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | ७ | ४ | २ | २ | ३ | २ | ११ | २ | ९ | ६ | ८ | ५६ |
| **सर्वसाधारण** | ५ | ३ | २ | २ | ३ | २ | ६ | २ | ७ | ४ | ६ | ४२ |
| **खेळाडु** | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | - | १ |
| **माजी सैनिक** | १ | १ | - | - | - | - | २ | - | १ | १ | १ | ७ |
| **प्रकल्पग्रस्त** | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | - | १ |
| **अंशकालीन** | १ | - | - | - | - | - | १ | - | १ | १ | १ | ५ |
| एकूण | ७ | ४ | २ | २ | ३ | २ | ११ | २ | ९ | ६ | ८ | ५६ |
| **दिव्यांग** | रिक्त ५६ पैकी २ पदे एका पायाने दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव आहे. | | | | | | | | | | | २ |

### ६) आरोग्य सेवक (महिला)

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | ३५ | १० | ३ | ३ | ४ | ३ | ४० | ३ | ३१ | १९ | ३८ | १८९ |
| **सर्वसाधारण** | २२ | ८ | ३ | ३ | ३ | ३ | २५ | ३ | १८ | १२ | २२ | १२२ |
| **खेळाडु** | २ | - | - | - | - | - | २ | - | २ | १ | २ | ९ |
| **माजी सैनिक** | ५ | १ | - | - | १ | - | ६ | - | ५ | ३ | ६ | २७ |
| **प्रकल्पग्रस्त** | २ | - | - | - | - | - | २ | - | २ | १ | २ | ९ |
| **भूकंपग्रस्त** | १ | - | - | - | - | - | १ | - | १ | - | १ | ४ |
| **अंशकालीन** | ३ | १ | - | - | - | - | ४ | - | ३ | २ | ४ | १७ |
| **अनाथ** | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| एकूण | ३५ | १० | ३ | ३ | ४ | ३ | ४० | ३ | ३१ | १९ | ३८ | १८९ |
| **दिव्यांग** | रिक्त १८९ पैकी १० पदे एका पायाने दिव्यांग(अपंग) उमेदवारांसाठी राखीव आहेत. (मा.उच्च न्यायालयाचे आदेशा नुसार १ पदासाठी एका पायाने अपंग प्रवर्गाचे पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद इतर अपंगाचे प्रवर्गातुन अदला बदलीने भरण्यात येईल.) | | | | | | | | | | | १० |

### ७) विस्तार अधिकारी (कृषी)

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | - | - | - | - | १ | - | - | - | - | | - | १ |
| **सर्वसाधारण** | - | - | - | - | १ | - | - | - | - | | - | १ |
| एकूण | - | - | - | - | १ | - | - | - | - | | - | १ |

### ८) स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | - | १ | - | - | - | - | ५ | - | ४ | २ | ८ | २० |
| **सर्वसाधारण** | - | १ | - | - | - | - | २ | - | २ | १ | ४ | १० |
| **महिला** | - | - | - | - | - | - | १ | - | १ | १ | २ | ५ |
| **माजी सैनिक** | - | - | - | - | - | - | १ | - | १ | - | १ | ३ |
| **अंशकालीन** | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | १ | २ |
| एकूण | - | १ | - | - | - | - | ५ | - | ४ | २ | ८ | २० |

### ९) पशुधन पर्यवेक्षक

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | १ | १ | - | - | - | - | १ | १ | २ | १ | - | ७ |
| **सर्वसाधारण** | १ | १ | - | - | - | - | १ | १ | १ | १ | - | ६ |
| **महिला** | - | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ |
| एकूण | १ | १ | - | - | - | - | १ | १ | २ | १ | - | ७ |

**१०) वरिष्ठ सहाय्यक (लेखा)**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | - | - | - | १ | - | - | १ | - | - | - | - | २ |
| **सर्वसाधारण** | - | - | - | १ | - | - | १ | - | - | - | - | २ |
| एकूण | - | - | - | १ | - | - | १ | - | - | | - | २ |

**११) अंगणवाडी पर्यवेक्षिका**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | - | - | - | - | १ | १ | - | - | - | | - | २ |
| **सर्वसाधारण** | - | - | - | - | १ | १ | - | - | - | | - | २ |
| एकूण | - | - | - | - | १ | १ | - | - | - | | - | २ |

**१२) कनिष्ठ सहाय्यक (लिपीक)**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ई.डब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | - | ३ | - | - | २ | - | ३ | १ | १२ | ७ | ४ | ३२ |
| **सर्वसाधारण** | - | २ | - | - | १ | - | २ | १ | ४ | ३ | ४ | १७ |
| **महिला** | - | १ | - | - | १ | - | १ | - | ३ | २ | - | ८ |
| **खेळाडु** | - | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ |
| **माजी सैनिक** | - | - | - | - | - | - | - | - | २ | १ | - | ३ |
| **प्रकल्पग्रस्त** | - | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ |
| **अंशकालीन** | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ | - | २ |
| एकूण | - | ३ | - | - | २ | - | ३ | १ | १२ | ७ | ४ | ३२ |
| **अपंग** | रिक्त ३२ पैकी ४ पदे दिव्यांग उमेदवारांसाठी राखीव आहे. (दोन्ही पायाने दिव्यांग-१, अंध-१, कर्णबधीर-२) | | | | | | | | | | | ४ |

**१३) विस्तार अधिकारी (सांख्यिकी)**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ईडब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | - | १ |
| **सर्वसाधारण** | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | - | १ |
| एकूण | - | - | - | - | - | - | १ | - | - | - | - | १ |

**१४) कनिष्ठ लेखाधिकारी**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा. व. | वि.मा. प्र. | एस.ई. बी.सी | ईडब्ल्यु एस. | खुला | एकुण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **पदसंख्या** | - | - | - | - | - | - | १ | - | १ | - | - | २ |
| **सर्वसाधारण** | - | - | - | - | - | - | १ | - | १ | - | - | २ |
| **एकूण** | - | - | - | - | - | - | १ | - | १ | - | - | २ |

**टिप :- १)** समांतर आरक्षणांतर्गत राखीव दर्शविलेल्या प्रवर्गाचे (अपंग व माजी सैनिक यांचेसाठी राखीव पदे वगळुन) पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच सामाजिक प्रवर्गातील उमेदवाराची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल.

२) सदरील जाहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या एकुण रिक्त पदांमध्ये माहे डिसेंबर २०१९ अखेर पर्यत रिक्त पदांचा समावेश करण्यात आलेला आहे. उमेदवारांच्या निवड प्रक्रिये नंतर जस-जशी पदे रिक्त होतील त्या प्रमाणे रिक्त होणाऱ्या पदांवर निवड झालेल्या उमेदवारांना नेमणुक देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

वरील कोष्टकात नमुद पदांकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुषंगिक बाबींचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

## परिशिष्ठ-अ

पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता व परिक्षेचे वेळापत्रक

| अ.क्र. | पदाचे नांव | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता व अनुभव | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | वेतन बँड ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३०० | स्थापत्य अभियांत्रिकी या विषयातील मान्यताप्राप्त पदवी किंवा पदविका (तीन वर्षाचा पाठयक्रम) किंवा तुल्य अर्हता धारण करुन असतील अशा उमेदवारामधुन नाम-निर्देशनाद्वारे नेमणुक करण्यात येईल. | |
| २ | कंत्राटी ग्रामसेवक | - | उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता परीक्षेत किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण<br>किंवा<br>शासन मान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम)<br>किंवा<br>शासन मान्य संस्थेची समाजकल्याणची पदवी (बी.एस.डब्ल्यु.)<br>किंवा<br>माध्यमिक शाळा प्रमाणपत्र किंवा तूल्य अर्हता आणि कृषी विषयाची पदविका दोन वर्षाचा अभ्यासक्रम धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाव्दारे नेमणूक करण्यात येईल. मात्र कृषी विषयाची पदवी किंवा उच्च अर्हता धारण करणाऱ्या किंवा समाजसेवेचा अनुभव आणि ग्रामीण अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल.<br>आणि<br>संगणक हाताळणी/वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. | |
| ३ | औषध निर्माता | वेतन बँन्ड ५२००-२०२०० ग्रेड पे-२८०० | औषध निर्माण शास्त्रातील पदवी किंवा पदवीका धारण करणारे आणि औषध शास्त्र अधिनियम १९४८ खालील नोंदणीकृत औषध निर्माते असलेले उमेदवार | |
| ४ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | वेतन बँन्ड ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४२०० | ज्याने मुख्य विषय म्हणुन भौतीकशास्त्र किंवा रसायनशास्त्र अथवा जीवशास्त्र किंवा वनस्पतीशास्त्र अथवा प्राणीशास्त्र किंवा सुक्ष्म जीवशास्त्र यासह विज्ञान विषयामध्ये पदवी धारण केली असेल अशा उमेदवारातून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | (परंतु हाफकिन संस्थेच्या वैद्यकिय प्रयोगशाळा तंत्रशास्त्रा मध्ये पदविका धारण करणाऱ्या उमेदवारांना अधीक पसंती देण्यात येईल. | |
| ५ (अ) | आरोग्य सेवक (पुरुष) | वेतन बँन्ड ५२००-२०२०० ग्रेड पे-२४०० | विज्ञान विषय घेवुन माध्यमिक शालांत परीक्षा उत्तिर्ण झालेले उमेदवार. ज्यांनी बहुउददेशिय आरोग्य कर्मचा-यांसाठी असणारा १२ महिन्याचा मुलभूत पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला नसेल अशा उमेदवारांनी नियुक्ती नंतर असे प्रशिक्षण पुर्ण करणे आवश्यक राहिल. | |
| ५ (ब) | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी | वेतन बँन्ड ५२००-२०२०० ग्रेड पे-२४०० | विज्ञान विषय घेवुन माध्यमिक शालांत परीक्षा उत्तिर्ण झालेले उमेदवार, राष्ट्रीय मलेरिया प्रतिरोध कार्यक्रमांतर्गत हंगामी क्षेत्र कर्मचारी म्हणुन ९० दिवसांचा फवारणी कामाचा अनुभव आवश्यक.<br>ज्यांनी बहुउददेशिय आरोग्य कर्मचा-यांसाठी असणारा १२ महिन्याचा मुलभूत पाठयक्रम यशस्वीरित्या पूर्ण केलेला नसेल अशा उमेदवारांनी नियुक्ती नंतर असे प्रशिक्षण पुर्ण करणे आवश्यक राहिल. | |
| ६ | आरोग्य सेवक (महिला) | वेतन बँन्ड ५२००-२०२०० ग्रेड पे-२४०० | ज्यांची अर्हता प्राप्त साह्यकारी प्रसाविका आणि महाराष्ट्र परिचर्या परिषदेमध्ये किंवा विदर्भ परिचर्या परिषदेमध्ये नोंदणी झालेली असेल किंवा अशा नोंदणीसाठी जे पात्र असतील. | |
| ७ | विस्तार अधिकारी (कृषि) | वेतन बँन्ड ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४२००/- | जे उमेदवार सांविधिक विद्यापिठाची कृषि विषयातील पदवी किंवा इतर कोणतीही समतुल्य अर्हता धारण करत असतील अशा उमेदवारामधुन नेमणुक करता येईल.<br>कृषि कामाची उच्च शैक्षणिक अर्हता व कृषि कामाचा अनुभव प्राप्त केला असेल किंवा सुधारीत कृषिचा ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव असेल अशांना प्राधान्य देण्यात येईल. | |
| ८ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | वेतन बँड ५२०० - २०२००/- ग्रेड वेतन २४००/- | माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील, आणि स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकाचा एक वर्षाचा पाठयक्रम परीक्षा उत्तीर्ण झालेले उमेदवार किंवा संविधीमान्य तत्सम खालील पाठयक्रम<br>१) स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या एक वर्षाचा पाठयक्रम उत्तीर्ण किंवा<br>२) आर्किटेक्चरल ड्राफ्ट्समन ( वास्तुशास्त्रीय आरेखक) किंवा<br>३) कन्स्ट्रक्शन सुपरवायझर (बांधकाम पर्यवेक्षक)<br>४) सैनिकी सेवेतील बांधकाम पर्यवेक्षकाचे अनुभव प्रमाणपत्र.<br>किंवा स्थापत्य अभियांत्रिकी मध्ये पदविका, पदवी,पदव्यूत्तर पदवी स्थापत्य मध्ये धारण करीत असणारे उमेदवार पात्र असतील. | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | परंतु ज्यांनी १९८०-८१ ते १९८६-८७ च्या दरम्यान तंत्र शिक्षण विभागाच्या शासकीय तांत्रिक संस्थेकडून घेण्यात येणारी स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यकांची एक वर्षे मुदतीची पाठ्यक्रम परीक्षा उत्तीर्ण केलेली आहे. अशा उमेदवारांच्या बाबतीत शासकीय तंत्र शिक्षण विभागाकडील त्यांच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या अधीन राहून वयोमर्यादा ४७ वर्षे इतकी शिथिल करता येईल. | |
| ९ | पशुधन पर्यवेक्षक | वेतन बँड ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४००/- | (दोन) (अ) संविधिक विद्यापीठाची, पशुवैद्यक शास्त्रातील पदवी धारण करीत असलेल्या व्यक्ती, किंवा<br>(ब) पशुधन पर्यवेक्षक, पशुपाल, पशुधन सहाय्यक, सहायक पशुधन विकास अधिकारी किंवा पशुधन विकास अधिकारी (ब श्रेणी) या बाबतची पशुसंवधन संचालनालयाने दिलेली पुढील पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणा-या व्यक्ती.<br>(१)त्यावेळच्या मुंबई राज्याने चालविलेल्या अभ्यासक्रमासह, पशुवैद्यक पशुपाल प्रशिक्षण अभ्यासक्रम<br>(२) पशुसंवर्धन विभाग महाराष्ट्र शासन आणि राज्यातील विविध संविधीक कृषि विद्यापीठे यांनी चालविलेल्या पशुधन पर्यवेक्षक अभ्यासक्रम<br>(३) पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन यांनी चालविलेला पशुवैद्यक व पशुसंवर्धन शास्त्रामधील दोन वर्षाचा सेवांतर्गत पदविका अभ्यासक्रम आणि,<br>(४) खालील संस्थांनी चालविलेला पशुवैद्यक शास्त्र विषयासह दुग्धशाळा व क्षेत्र व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका या मधील दोन वर्षाचा पदविका अभ्यासक्रम,<br>(एक)महाराष्ट्र तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ, किंवा<br>(दोन) राज्यातील विविध संविधीक कृषी विद्यापीठे किंवा<br>(ब) ज्यामुळे नोंदणीकृत पशुवैद्यक व्यवसायीच्या पर्यवेक्षणाखाली व निदेशनाखाली किरकोळ पशुवैद्यकिय सेवा करण्याचा हक्क असेल अशी, भारतातील कोणत्याही पशुवैद्यक संस्थेची पदविका किंवा प्रमाणपत्र धारण करणाऱ्या व्यक्ती.<br>परंतु, किरकोळ पशुवैद्यकिय सेवा करण्याचा त्यांना हक्क मिळवून देणाऱ्या पदविकेचा किंवा प्रमाणपत्राचा धारक, भारतीय पशुवैद्यक परिषद अधिनियम १९८४ (१९८४ चा ५२ याच्या कलम ३० च्या खंड (ख) च्या परंतुकातील स्पष्टीकरणान्वये व कलम ५७ अन्वये कृषि, पशुसंवर्‌धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाने महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात काढलेल्या क्र. आयव्हीसी-१००६ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | प्र.क्र.५३२/पदुम-४ दिनांक २७ ऑगस्ट २००९ च्या अधिसुचने व्दारे विनिर्दिष्ट केलेल्या किरकोळ पशुवैद्यकीय सेवाच देण्यास हक्कदार असेल , आणि<br>(तीन) माहिती तंत्रज्ञान संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्याकडून वेळोवेळी विहित केलेले संगणक वापराबाबतचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे. | |
| १० | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | वेतन बँन्ड ५२००-२०२०० ग्रेड वेतन २४०० | मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी धारण करीत असतील या बाबत लेखा शास्त्र व लेखा परिक्षा हे विशेष विषय घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणा-या अथवा पहिल्या किंवा दुस-या वर्गातील पदवी धारण करणा-या अथवा कोणत्याही सरकारी कार्यालयात अथवा व्यापारी संस्थेत अथवा स्थानिक प्राधिकरणात तीन वर्षाहून कमी नसेल इतक्या अखंड कालावधी पर्यंत लेखा विषयक कामांचा पदवी नंतरचा प्रत्यक्ष अनुभव असलेल्या उमेदवारांना अधिक पसंती दिली जाईल. | |
| ११ | अंगणवाडी पर्यवेक्षिका (सरळसेवा) | वेतन बँन्ड ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४१०० | ज्या महिला उमेदवारांनी एखादया संविधिक विद्यापीठाची, खास करुन समाजशास्त्र किंवा गृहविज्ञान किंवा शिक्षण किंवा बालविकास किंवा पोषण किंवा समाजशास्त्र या विषयातील स्नातक ही पदवी धारण केलेली आहे. | |
| १२ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | वेतन बँन्ड ५२००-२०२०० ग्रेड वेतन १९०० | माध्यमिक शालांत परीक्षा अथवा तुल्य परीक्षा उत्तीर्ण झाले असतील आणि महाराष्ट्र शासनाच्या शासकीय कर्मचाऱ्यांची मराठी टंकलेखन व लघुलेखन यातील परीक्षा घेण्यासाठी असलेल्या एतदर्थ मंडळाने किंवा आयुक्त, शासकीय परीक्षा विभाग शिक्षण संचलनालय, महाराष्ट्र राज्य यांनी मराठी-३० टंकलेखनाचे शब्द या गतीने दिलेले प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य राहिल. (शासन निर्णय ग्रा.वि.वि.म.शा. क्र.एपीटी-१९९३/१३२८/सीआर११४१/१३ दिनांक ६ जानेवारी १९९७ नुसार) | |
| १३ | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | वेतन बँन्ड रुपये ९३००-३४८००- ग्रेड वेतन ४२०० | संविधीमान्य विद्यापिठाची विज्ञान, कृषि, वाणिज्य किंवा वाडःमय शाखेची अर्थशास्त्र किंवा गणित अथवा सांख्यिकी विषयासह प्रथम अगर द्वितीय वर्गातील पदवी धारण करीत असतील किंवा ज्यांना नमुना सर्वेक्षण करण्याचा अनुभव असेल, किंवा पदवी व अनुभव दोन्ही असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येईल. परंतु, उक्त विषयांपैकी एका विषयाची स्नातकोत्तर पदवी धारण करणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल. | |
| १४ | कनिष्ठ लेखाधिकारी | वेतन बँन्ड ९३००-३४८००- ग्रेड वेतन ४२०० | ज्यांनी मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी धारण केली असेल व कोणतेही सरकारी कार्यालय व्यापारी भागीदार संस्था अथवा स्थानिक प्राधिकरण यातील किमान ५ वर्षाचा अखंड सेवेचा ज्यांना अनुभव असेल अशा उमेदवारामधुन नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यात येईल. या बाबतीत लेखाशास्त्र आणि लेखा परिक्षा हे विशेष विषय | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | घेऊन वाणिज्य शाखेतील पदवी धारण करणा-यांनाअथवा प्रथम वा व्दितीय वर्गातील पदवी धारण करणा-यांना अधिक पसंती दिली जाईल किंवा गणित अथवा सांखिकी अथवा लेखा शास्त्र व लेखा परिक्षा हे प्रमुख विषय घेऊन पदव्युत्तर पदवी धारण करीत असतील अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाव्दारे नेमणुक करण्यात येईल.याबाबतीत कोणत्याही सरकारी कार्यालयातील अथवा व्यापारी संस्थेतील अथवा स्थानिक प्राधीकरणातील लेखा कार्याचा अनुभव असणा-यास अधिक पसंती दिली जाईल. | |

➢ **<u>वरील सर्व पदांसाठी आवश्यक सामाईक अर्हता खालील प्रमाणे असेल.</u>**

| अ.क्र. | सामाईक अर्हता | तपशिल |
|---|---|---|
| १) | संगणक अर्हता :- | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९ दिनांक १९.०३.२००३ मधील तरतुदी नुसार (अ) D.O.E.A.C.C. सोसायटीच्या CCC किंवा O स्तर किंवा B किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचे कडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र यापैकी एक प्रमाणपत्र किंवा माहिती तंत्रज्ञान (साप्रवि) विभागाच्या शासन निर्णय क्रमांक मातंस२०१५/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ४.२.२०१३ व शासन पुरकपत्र क्र. मातंस २०१२/प्र.क्र.२७०/३९ दिनांक ८.१.२०१८ मध्ये नमुद केल्यानुसार आवश्यक संगणक अर्हता विहित मुदतीत प्राप्त करणे बंधनकारक आहे.<br>**(कंत्राटी ग्रामसेवक व पशुधन पर्यवेक्षक या पदांकरीता सेवाप्रवेश नियमात नमुद प्रमाणे अर्ज करतांना वरील प्रमाणे संगणक अर्हता प्राप्त करणे बंधनकारक आहे.)** |
| २) | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र | महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम २००५ मधील तरतुदीनुसार शासकीय सेवेतील भरतीमध्ये विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नियुक्ती वेळेस हजर होतांना विवाहीत उमेदवारांनी सादर करणे बंधनकारक राहील.<br>प्रतिज्ञापत्रात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, अपत्यामुळे उमेदवार शासकीय सेवेच्या नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल. |

## ➢ वरील सर्व पदांसाठी परीक्षेचे स्वरुप व दर्जा

## वरील सर्व पदांकरीता ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेतली जाईल.

| अ. क्र. | पदाचे नांव / संवर्ग | भाग-१ इंग्रजी | भाग-२ मराठी | भाग-३ सामान्य ज्ञान | भाग-४ तर्कक्षमता / अनुमानात्मक चाचणी | भाग-५ तांत्रिक | एकुण प्रश्न | एकुण गुण | नकारात्मक गुणदान | परीक्षेचा कालावधी (मिनीटे) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एकुण प्रश्न | एकुण प्रश्न | एकुण प्रश्न | एकुण प्रश्न | एकुण प्रश्न | | | | |
| १ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | पदविका दर्जा | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | फक्त इंग्रजी | | | | |
| २ | ग्रामसेवक(कंत्राटी) | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | इ.१२वी | इ.१२वी | इ.१२वी | इ.१२वी | पदविका | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | | | | |
| ३ | औषध निर्माता | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | पदविका दर्जा | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | फक्त इंग्रजी | | | | |
| ४ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | पदवी | इ.१२वी | पदवी | पदवी | पदवी | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | फक्त इंग्रजी | | | | |
| ५अ | आरोग्य सेवक (पुरुष) | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | | | | |
| ५ब | आरोग्य सेवक (पुरुष) हं.फ.कर्म | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | | | | |
| ६ | आरोग्य सेविका | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | | | | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | विस्तार अधिकारी (कृषी) | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | पदवी | इ.१२वी | पदवी | पदवी | पदवी | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | | | | |
| ८ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | फक्त इंग्रजी | | | | |
| ९ | पशुधन पर्यवेक्षक | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | पदविका दर्जा | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | | | | |
| १० | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | पदवी | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | | | | |
| ११ | पर्यवेक्षिका (अंगणवाडी) | २५ | २५ | २५ | २५ | लागु नाही | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | पदवी | इ.१२वी | पदवी | पदवी | लागु नाही | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | लागु नाही | | | | |
| १२ | कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) | २५ | २५ | २५ | २५ | लागु नाही | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | इ.१०वी | लागु नाही | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | लागु नाही | | | | |
| १३ | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) | २५ | २५ | २५ | २५ | लागु नाही | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | पदवी | इ.१२वी | पदवी | पदवी | लागु नाही | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | लागु नाही | | | | |
| १४ | कनिष्ठ लेखाधिकारी | १५ | १५ | १५ | १५ | ४० | १०० | २०० | नाही | ९० मी. |
| | काठिण्य पातळी | पदवी | इ.१२वी | पदवी | पदवी | पदवी | | | | |
| | प्रश्न पत्रिकेचे माध्यम | इंग्रजी | मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | इंग्रजी व मराठी | | | | |

**(१) ऑनलाईन परीक्षेचा दर्जा / स्तर**

१. ऑनलाईन परीक्षेतील प्रश्नांचा स्तर हा त्या त्या पदांच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये विहित करण्यात आलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेच्या दर्जापेक्षा निम्न असणार नाही.

२. ज्या पदांकरिता पदवी ही कमीतकमी अर्हता आहे अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठांच्या पदवी परीक्षेच्या दर्जाच्या समान राहील. परंतु त्यापैकी मराठी व इंग्रजी या विषयांच्या पश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता १२ वी) दर्जाच्या समान राहील.

**(२) ऑनलाईन परीक्षेव्दारे निवडीची कार्यपध्दती**

सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक १३ जून २०१८ नुसार गट-क संवर्गातील पदे भरतांना खालील कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

१. गट क मधील सर्व पदांकरीता उमेदवारांची निवड करातांना २०० गुणांची परीक्षा घेण्यात येईल.

२. अशा परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे किमान ४५ % गुण मिळविणाऱ्या उमेदवारांमधुन निवड सुची तयार करण्यात येईल.

३. कनिष्ठ अभियंता (स्थापत्य/विद्युत/यांत्रिकी), औषध निर्माता, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक या तांत्रिक संवर्गातील पदांच्या तांत्रिक भागाचे प्रश्न इंग्रजी माध्यमातुन राहतील.

**(३) निवड सुची व तीची कालमर्यादा**

निवड समितीने तयार केलेली निवडसूची १ वर्षासाठी किंवा निवडसूची तयार करतांना ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहेत त्या दिनांकापर्यंत, यापैकी जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राहय राहील. त्यानंतर ही निवडसूची व्यपगत होईल.

**(४) समान गुण असल्यास अनुसरावयाची कार्यपध्दती**

साप्रवि शासन पूरकपत्र क्रमांक:प्रानिमं-१२१७/(प्र.क्रं.९२/१७)/१३-अ दिनांक ०२ डिसेंबर,२०१७ व सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रानिमं१२१६/(प्र.क्रं.६५/१६)/१३-अ दिनांक १३ जून,२०१८ अन्वये परिक्षेचा निकाल तयार करतांना परिक्षेत ज्या पात्र उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता यादीमधील प्राधान्यक्रम पुढील प्रमाणे निश्चित करण्यात येईल.

| |
|---|
| **अ)आत्महत्याग्रस्त** शेतक-याच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील. |
| **ब)** वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल. |
| **क)** समान वय असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्चतम शैक्षणीक अर्हता (पदयुत्तर पदवीधर, पदवीधर, उच्च माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण, माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण अशा प्रकारे धारण करणाऱ्या उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल) |
| **ड)** वरील प्रमाणे दोन्ही अटी समान ठरत असल्यास उमेदवाराच्या बाबतीत, सदर पदाकरीता आवश्यक असलेल्या किमान शैक्षणिक अर्हतेमध्ये उच्चतर गुण प्राप्त उमेदवारास प्राधान्यक्रम देण्यात येईल. |

(५) सर्वसाधारण सुचना

उमेदवारांना परीक्षे करीता अर्ज सादर करीत असतांना कोणतेही कागदपत्र सादर करण्याची आवश्यक्ता नाही. कागदपत्र पडताळणीच्या प्रक्रिये वेळी पदाकरीता आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

| सर्वसाधारण अटी व शर्ती | शेरा |
|---|---|
| अ) उमेदवार भारताचा नागरीक असावा | |
| ब) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा | डोमीसाईल प्रमाणपत्र आवश्यक |
| क) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रं. मकसी१००७/प्र.क्र.३६/का.३६ दिनांक १० जुलै २००८ अन्वये महाराष्ट्र कर्नाटक सिमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना वरील पदासाठी अर्ज करता येईल. | सदर उमेदवारांनी ८६५ गावांतील १५ वर्षाचे वास्तव्य असलेल्या रहिवाशी असल्याचा सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुण्यातील दाखला कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे अनिवार्य राहिल. |

**(६) वयोमर्यादा**

**अ)**

I) उमेदवाराने अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास अर्ज केलेल्या पदाकरीता विहित वयोमर्यादा आणि आवश्यक किमान शैक्षणिक अर्हता धारण करणे आवश्यक राहिल.

II)अर्ज सादर करण्याचे अंतिम दिनांकास खुल्या व सामाजिक आरक्षण प्रवर्गातील उमेदवारांचे वय १८ पेक्षा कमी नसावे.

III)अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकास खुल्या प्रवर्गातील उमेदवारांचे वय ३८ वर्ष पेक्षा जास्त नसावे.

**ब) सामाजिक व समांतर आरक्षणानुसार विहित वयोमर्यादेचा तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | आरक्षण/समांतर आरक्षण | शसन निर्णयानुसार आरक्षणाकरिता कमाल वयोमर्यादा |
|---|---|---|
| १ | मागासवर्गीय उमेदवार | ४३ वर्षे |
| २ | अपंग उमेदवार | ४५ वर्षे |
| ३ | प्रकल्पग्रस्त | |
| ४ | भुकंपग्रस्त | |
| ५ | सन १९९१ च्या जनगणना/सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी | |
| ६ | स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशीत पाल्य | |
| ७ | शासकीय कर्मचारी/ जिल्हा परिषद नियमीत कर्मचारी/ (नियुक्ती प्राधिकारी/ सक्षम प्राधिकारी यांची परवानगी आवश्यक राहील. | |
| ८ | अंशकालीन कर्मचारी | ५५ वर्षे |
| ९ | उच्च गुणवत्ता धारक खेळाडु उमेदवार | सर्व प्रवर्गातील उमेदवारांसाठी ४३ वर्षे |
| १० | माजी सैनिक | सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक मासैक-१०१०/प्र.क्र.२७९/१०/१६ अ दि. २० ऑगस्ट २०१० अन्वये उमेदवारांच्या सशस्त्र दलांत झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ३ वर्षे इतका राहील तसेच अपंग माजी सैनिकासाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील. |
| ११ | अनाथ | खुला प्रवर्ग ३८ वर्ष |
| १२ | खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (ईडब्ल्युएस) | ४३ वर्षे |

**क) संवर्ग निहाय वयोमर्यादा**

| अ.क्रं. | संवर्गाचे नांव | कमीत कमी वय | जास्तीत जास्त वय (खुला) | मागासवर्गीया करीता |
|---|---|---|---|---|
| १ | आरोग्य सेवक (महिला) | १८ | ४० | ४३ |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी | १८ | ४५ | ४५ |

**या शिवाय विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.**

| (७) अर्ज भरण्याची कार्यपद्धतीआणि सुचना :- | |
|---|---|
| १) | उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्या बाजूला असलेल्या ‘सूचना’ या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या/तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे. (Activation लिंकही 2 दिवसांकरिता activate असेल.) उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉग ऑन होता येईल<br>टीप : USERNAME आणि PASSWORDजतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल . |
| २) | उमेदवाराचे नाव, वडीलांचे, पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. |
| ३) | छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी २०० pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची ६० पिक्सल आणि रुंदी १४० पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान ३ KB ते ५० KB च्या दरम्यान असावे. (टिप:-उमेदवाराने अली कडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे .) |
| ४) | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ. सहित माहिती भरावी. |
| ५) | त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने / तिने आपला जात प्रवर्ग निवडावा.<br>उमेदवाराने आपल्या जात प्रवर्गाची निवड करण्या आधी जाहिरात वाचणे अपेक्षित आहे. ऑनलाईन पद्धतीने आवेदनअर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातींचे काळजीपूर्वक वाचन करावे जाहिरातीतील सूचना पूर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वतः घ्यावी .<br>उमेदवार जर ST प्रवर्गात मोडत असेल तर त्यास तो ST-PESA प्रवर्गा मध्ये अर्ज करू इच्छितो का नाही याची निवड |

करावी लागेल. उमेदवारास ST -PESA साठी अर्ज करावयाचा असल्यास त्याच्या कडे स्वत: किंवा त्यांचे आई-वडील किंवा आजी-आजोबासंबंधित जिल्हयाच्या अनुसूचितक्षेत्रामध्ये दि.२६ जानेवारी १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत आहेत या संबंधीचा महसुली पुरावा असणे आवश्यक आहे.

६) ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी, तसेच उमेदवाराने आधार क्रमांक/ आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी .समांतर आरक्षण (लागू असल्यास) त्यासंबंधीची माहिती द्यावी. तसेच उमेदवार शारीरिकदृष्टया विकलांग असल्यास त्याला आपल्या विकलांगतेचा प्रकार निवडणे आवश्यक आहे.
(कृपया पदानुसार लागू असलेल्या शारीरिक विकलांगता प्रकारासाठी जाहिरात पहा.)

७) तसेच मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास) या संबंधीची माहिती द्यावी लागेल.

८) शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रते मध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्या प्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तसेच पदाच्या अर्हतेनुसार आवश्यक ती शैक्षणिक माहिती देणे आवश्यक आहे. तरच आपणास त्यापदासाठी अर्ज करता येईल.

९) एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की अर्जदार पुढे या बटणावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

१०) त्यानंतर उमेदवारास पदांची निवड करावी लागेल.

उमेदवार एकाच अर्जामध्ये पात्र असलेल्या (जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक पात्रता, वयाची अर्हता आणि अन्य अर्हता विचारात घेवून) सर्व पदांना (इच्छूक असल्यास ) अर्ज करू शकतो. त्यामूळे पदांनुसार वेगळा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही. परंतु, प्रत्येक पदासाठी त्याला स्वतंत्र परीक्षा शुल्क आकारले जाईल. अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांना त्यांचे पदनिहाय आणि जिल्हा निहाय वेळापत्रक (शेड्युल- वेळ आणि दिनांक) परीक्षेचे प्रवेशपत्रासोबत उपलब्ध करुन देण्यात येईल.

परीक्षा वेळापत्रक (शेड्युल- वेळ आणि दिनांक) हे उमेदवारांना त्यांनी अर्ज केलेल्या पद निहाय आणि जिल्हा निहाय हॉल तिकीटाव्दारे देण्यात येईल.

| अनु. न. | **पदाचे नाव इंग्रजी मध्ये** | **पदाचे नाव मराठी मध्ये** |
|---|---|---|
| १ | Junior Engineer (Civil) | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) |
| २ | Gramsevak - Contractual | ग्रामसेवक - कंत्राटी |
| ३ | Pharmacist | औषध निर्माता |
| ४ | Laboratory Technician | प्रयोगशाळा तंत्रज्ञ |
| ५ A | Health worker (Male) | आरोग्य सेवक (पुरुष) |
| ५ B | Health worker (Male-Seasonal spraying) | आरोग्य सेवक (पुरुष) हंगामी फवारणी कर्मचारी |
| ६ | Health Worker (Female) | आरोग्य सेविका |
| ७ | Extension Officer(Agriculture) | विस्तार अधिकारी (कृषी) |
| ८ | Civil Engineering Assistant | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक |

| | | | |
|---|---|---|---|
| | ९ | Live Stock Supervisor (Animal Husbandry) | पशुधन पर्यवेक्षक |
| | १० | Senior Assistant (Account) | वरिष्ठ सहाय्यक (लेखा) |
| | ११ | Supervisor (ICDS) (Nomination) | पर्यवेक्षिका (अंगणवाडी) |
| | १२ | Junior Assistant (Ministerial) | कनिष्ठ सहाय्यक (लिपिक) |
| | १३ | Extension Officer (Statistical) | विस्तार अधिकारी (सांख्यिकी) |
| | १४ | Junior Account's Officer | कनिष्ठ लेखाअधिकारी |

| | |
|---|---|
| ११) | त्यानंतर उमेदवारांस त्या पदासाठी आवश्यक असलेली पात्रतेबद्दलची माहिती देवून ती सेव्ह करणे आवश्यक आहे. |
| १२) | उमेदवारास निवड केलेल्या प्रत्येक पदासाठी आपण अर्ज करू इच्छित असलेल्या जिल्हा परिषदेची निवड करावी लागेल. कृपया पदानुसार जिल्हा परिषदेची निवड करण्या आधी जाहिरात वाचावी, येथे यादी मध्ये निवड करण्यासाठी उपलब्ध असलेले जिल्हे हे जाहिराती मध्ये नमूद केल्या प्रमाणे रिक्त पदांचा विचार करून दाखवण्यात आलेले आहेत. उमेदवाराचा विचार हा फक्त त्याने पदासाठी निवड केलेल्या जिल्हा परिषदे साठीच केला जाईल. |
| १३) | उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परिक्षा केंद्राकरिता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. तीनही पसंती क्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षाकेंद्र उपलब्ध नसल्यास उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल. |
| १४) | उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पध्दतीने आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. परीक्षेचा शुल्क भरणा हा फक्त ऑनलाईन पध्दतीने (नेट बँकींग, क्रेडिट कार्ड/ डेबिट कार्ड, ई-वॉलेट, भारतीय स्टेट बँकेच्या चलनाद्वारे) करता येईल. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट काढण्याचा पर्याय असेल. |
| १५) | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम दिनांकास मध्यरात्री 11.59 P.M. वाजल्यानंतर संकेतस्थळा वरील लिंक बंद केली जाईल. |
| १६) | जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल, कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नंबर १८००३०००७७६६ वर कॉल करा.<br>नोंद :-नोंदणी मधील तपशील जसे की वापरकर्ता नाव (USERNAME), ई मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण), निवडलेले पद ,पसंतीचे स्थान 1/2/3, जन्मतारीख, उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी, शैक्षणिक पात्रतेचा तपशील,पदासाठी निवड केलेली जिल्हा परिषद इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. |

| | |
|---|---|
| **(८) अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन:-** | |
| १) | युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो. |
| २) | अर्ज प्रिंट करण्यासाठी **"प्रिंट प्रिव्हयू"** या पर्यायावर क्लिक करा.<br>नोंद:उमेदवाराने आपला PDF स्वरूपातील अर्ज,परीक्षा प्रवेश पत्र संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत स्वत:जवळ ठेवावा. |
| ३) | **प्रत्येक अर्जदाराने केलेल्या ऑनलाईन अर्जाची पीडीएफ प्रत डाऊनलोड करुन त्याची प्रत (hard copy) पदभरती प्रक्रिया व नोंदणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जतन करुन ठेवणेची आहे. जर अर्जदाराने अर्जाच्या फॉर्मची पीडीएफ प्रत नोंदणी स्क्रीन वरुन डाऊनलोड केली नसेल अथवा ती हरवली असेल तर त्यास परीक्षा घेणारी संस्था (Exam conducting bodies)/परीक्षा प्राधिकरण (Exam authorites)/महापरीक्षा (MahaPariksha) अथवा नियुक्ती प्राधिकारी (Appointing Authorites) जबाबदार राहणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.** |
| ४) | संगणकावर आधारीत परिक्षा संपल्यानंतर हॉल तिकीट डाऊनलोड करण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही, याची उमेदवारांनी स्पष्ट नोंद घ्यावी. |
| **(९) महत्त्वाच्या सूचना:** | |
| १) | १)उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.<br>२) परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थिती मध्ये (वैद्यकीय किंवा इतर कारणांसाठी सुध्दा) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.<br>३) उमेदवार जे वेगवेगळे विभाग/ वेगवेगळ्या पदांसाठी अर्ज करत असतील, अशा उमेदवारांनी सर्व विभाग /पदे यां करिता सारखी परीक्षा शहरांची निवड करावी. अन्यथा वेगवेगळ्या पदांसाठीच्या परीक्षे साठी वेगवेगळे परीक्षा केंद्र /शहर मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>४)उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंती क्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी जवळील परीक्षा केंद्र नेमून देण्यात येईल.<br>५) उमेदवाराने एका पदासाठी फक्त एकदाच अर्ज करावा, जर एका उमेदवाराने **एका पदासाठी, एकापेक्षा अधिक** अर्ज केलेले आहेत असे आढळून आले, तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.<br>६) उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थिती मध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही.<br>७) परीक्षेच्या वेळी उमेदवाराने खालील पैकी सध्याचे वैध फोटो ओळखपत्र पुरावा म्हणुन सोबत ठेवणे आवश्यक आहे.<br>(१) पॅनकार्ड, (२) पासपोर्ट, (३) वाहन अनुज्ञप्ती (४) मतदार ओळखपत्र<br>(५) फोटोसह राष्ट्रीयकृत बँकपासबुक (६) मूळ आधारकार्ड |
| २) | उमेदवारास विभागीय परीक्षा तसेच हिंदी व मराठी परीक्षा तत्संबंधी नियमानुसार परीक्षा पूर्वीच उत्तीर्ण झाला नसल्यास किंवा त्या उत्तीर्ण होण्यातून सूट देण्यात आली नसल्यास त्याला/तिला परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल. |
| ३) | उमेदवारांना ऑनलाईन/व्यावसायिक परिक्षेस तसेच मूळ कागदपत्रांच्या छाननीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. उपस्थित राहिल्याबाबत त्यांना कोणत्याही प्रकारचे प्रवास भाडे अथवा भत्ता देय राहणार नाही. |
| ४) | निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा प्रलोभन दाखविल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ५) | उमेदवारांची जिल्हा परिषद सेवेसाठी निवड होवून नियुक्ती मिळाल्यास त्यांना शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या सेवाप्रवेशोत्तर परीक्षा, विभागीय परीक्षा आणि इतर परीक्षा व प्रशिक्षण विहित संधीत व विहित कालावधीत उत्तीर्ण व्हावे लागेल. अन्यथा शासनाने वेळोवळी विहित केलेप्रमाणे सदरची नियुक्ती संपुष्टात आणणे इत्यादी कारवाई केली जाईल. |
| ६) | निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात नमूद केलेली माहिती/अगर बनावट कागदपत्रे सादर केल्याचे/उमेदवाराने सादर केलेली माहिती वस्तुस्थितीदर्शक नसल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे केव्हाही निदर्शनास आल्यास केलेली निवड/नेमणूक रद्द केली जाईल. |
| ७) | फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने या कार्यालयास प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. |
| ८) | निवडणूक अथवा नैसर्गिक आपत्ती किंवा अन्य काही कारणामुळे विहित दिवशी परीक्षा घेणे शक्य झाले नाही तर सोयीच्या अन्य दिवशी परीक्षा घेतली जाईल. |
| ९) | अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेस बोलावण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. |
| १०) | **उक्त जाहिरातीमध्ये घोषित केलेल्या पदांकरीता मुलाखती नसलेने प्रथम अंतरिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. मूळ कागदपत्रांची छाननी अंती व आक्षेप/हरकतींचा विचार करुन अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल.** |
| ११) | या परीक्षेत ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना जरी उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे सादर करावयाची आवश्यकता नसली तरीही ज्या उमेदवारांकडे पदाकरीता आवश्यक शैक्षणिक व इतर पात्रता नसेल अशा उमेदवारांनी अर्ज करु नयेत. |
| १२) | **उमेदवाराद्वारे निवडलेल्या ३ प्राधान्य शहरांपैकी परीक्षा केंद्रांची/कॉम्प्युटर नोड्सची संख्या अपर्याप्त असल्यास उमेदवारांना महाराष्ट्रातील उपलब्ध असलेल्या अन्य कोणत्याही शहरांमध्ये/ केंद्र उपलब्ध असलेल्या क्षमतेनुसार शहर/परीक्षा केंद्राचे वाटप केले जाईल. याबाबत कोणालाही आक्षेप नोंदविता येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.** |
| १३) | **अर्जदारांना अर्ज भरण्यासंदर्भात काही अडचणी आल्यास त्यासाठी १८००-३०००-७७६६ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा.** |

| (१०) विशेष सुचना | |
|---|---|
| १) | महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनिया/१००५/१२६ सेवा-४ दिनांक ३१ ऑक्टोबर २००५ नुसार दि.०१ नोव्हेंबर, २००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल त्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना समाप्त करुन शासनाने नव्याने दिनांक ०१.०४.२०१५ पासून लागू केलेली राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजना लागू राहील. मात्र सद्या अस्तित्वात असलेल्या निवृत्ती वेतन योजना म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९७४ आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू होणार नाही. |
| २) | माजी सैनिकासाठी असलेल्या पदांवर शिफारशीसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यांच्यासाठी आरक्षीत असलेली पदे भरती संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश, परिपत्रक, शासन निर्णय यानुसार कार्यवाही करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| ३) | खेळाडू/महिला/प्रकल्पग्रस्त/भंकुपग्रस्त/अनाथ/पदवीधर अंशकालीन उमेदवार या समांतर आरक्षणाचे प्रवर्गातुन पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदांसाठी त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन सर्वसाधारण (समांतर आरक्षण विरहीत) पात्र उमेदवारांमधून गुणवत्तेनुसार विचार होवू शकेल. |
| ४) | निवड झालेल्या उमेदवारांना प्रशासकिय सोय विचारात घेऊन उपलब्ध असलेल्या रिक्त पदी प्रथम पदस्थापना देण्यात येईल. उमेदवारांनी पदस्थापनेबाबत कोणत्याही प्रकारे सक्षम प्राधिकाऱ्यांवर दबाव आणल्यास त्यांचे नाव निवड यादीतून कमी करण्यात येईल. |
| ५) | पात्रता परीक्षेचे प्रवेशपत्र व परीक्षेसंबंधी सुचना या केवळ संकेत स्थळावरूनच उपलब्ध करण्यात येणार असल्याने व मोबाईल एसएमएसव्दारे/ईमेलव्दारे सुचना निर्गमीत करण्यात येणार असल्याने उमेदवारांनी सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेची माहिती कार्यक्रमाबाबत अद्यावत राहण्याची व पात्रता परीक्षेचे प्रवेशपत्र डाऊनलोड करून घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. |
| ६) | सदर पदभरतीचे नियम/निकषामध्ये पदभरती पुर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमीत होणाऱ्या शासन निर्णय/परीपत्रक/अधिसुचना यानुसार बदल होवू शकतो. |
| **(१२) सामाजिक व समांतर आरक्षणाचे अनुषंगाने महत्वाच्या सुचना** | |
| १) | **दिव्यांग (विकलांग/अपंग) ३%** :- अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपुर्ण सहभाग) अधिनियमातील तरतुदी, शासन परिपत्रक साप्रवि दिनांक ०२.०५.१९९८, शासन परिपत्रक दिनांक ०६.०५.२००४, ग्राम विकास व जलसंधारण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक अपंग-२०१०/प्र.क्र.२५०/आस्था-९, दिनांक १४ जानेवारी, २०११, शासन परिपत्रक दिनांक २८.०७.२०१४ आणि शासन शुध्दीपत्रक क्रमांक अपंग-२०१/प्र.क्र.२५७/आस्था-८, दि.२९ डिसेंबर, २०१८ मधील तरतुदी नुसार दिव्यांग उमेदवारांना आरक्षणाच्या तरतुदी नुसार लागु असलेले प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.<br>**शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक अपंग-२००७/प्रक्र.६११/सुधार-३, दिनांक २० एप्रिल, २००७ शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक न्याय-२००७/स.न्या/प्र.क्र.१०३ (भाग-३/१६-अ, दिनांक १९ ऑक्टोंबर, २००७ तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक अपंग-१००९/प्र.क्र.२७६/०९/१६-अ, दिनांक १९ मार्च, २०१० अन्वये विहीत करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार विकलांग व्यक्तीसाठी आरक्षित असलेल्या पदावर सरळसेवेने निवड करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे, याचा विचार न करता विकलांग गुणवत्ताक्रमानुसार प्रथम त्याची निवड करण्यात येईल व निवड केल्यानंतर सदर उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील असेल, त्या सामाजिक प्रवर्गात उमेदवारास सामावून घेण्यात येईल.**<br>**लेखनिक व अनुग्रह कालावधीबाबत**<br>दिव्यांग (विकलांग/ अपंग) प्रवर्गातुन अर्ज करणाऱ्या उमेदवाराकडे किमान ४० टक्के दिव्यांग असल्याचे सक्षम वैद्यकिय अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.कअस १३१५/ प्र.क्र. १२०/ १४ब, दि.१६ एप्रिल, २०१६ नुसार अंधत्व किंवा क्षीणदृष्टी, श्रवणशक्तीतील दोष व चलन वलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांग वायू या प्रकारच्या पात्रतेचे निकष धारण करणारे विकलांग उमेदवार गुणवत्तेनुसार पात्र असतील. शासन परिपत्रक दि. १८.०३.२०१४ अन्वये अपंग उमेदवारांस लेखनिकांची मदत आवश्यक असल्यास ऑनलाईन अर्ज भरताना तसा स्पष्ट उल्लेख करावा. उमेदवाराने स्वत: लेखनिक/ सहाय्यकाची व्यवस्था करणे आवश्यक राहिल. जे उमेदवार लेखनिक / सहाय्यक हा पर्याय निवडतील त्यांना प्रवेशपत्रासोबत लेखनिक घोषणापत्र प्राप्त होईल. सदरील घोषणापत्र उमेदवाराने राजपत्रित अधिकारी यांचेकडुन सांक्षांकित करुन घेऊन परीक्षेच्या वेळी सोबत आणने बंधनकारक राहिल.<br>ज्या उमेदवारांनी लेखनिकाची अर्जात मागणी केलेली नसेल अशा दिव्यांग उमेदवारांना सदर सवलतीचा लाभ मिळणार नाही याची नोंद घ्यावी. |

| | |
|---|---|
| २) | **महिला आरक्षण**<br>अ) महिला व बालकल्याण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/म.से.आ-२०००/प्र.क्र. ४१५/ का.२, दि.२५.०५.२००१ मधील तरतदीनुसार महिलांसाठी आरक्षण राहील. ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे अनिवार्य आहे.<br>ब) महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या महिला उमेदवारांनी महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक ८२/ २००१/ मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का.२, दिनांक २५.५.२००१ तसेच शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग , क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६//१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट २०१४ आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०१७/ प्र.क्र.१९१/१७/कार्या-२/दिनांक १५.१२.२०१७ नुसार शासनाने प्रस्तावित केलेले उन्नत व प्रगत गटात (क्रिमिलेअर ) मोडत नसल्याचे सक्षम प्राधिका-यांनी दिलेले अलिकडचे / नवीनतम मुळ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Latest Non Creamy Layer Certificate ) कागदपत्र छाननीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच महिला आरक्षणाच्या उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची तपासणी विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास विभाग यांचेमार्फत करणे आवश्यक राहील. |
| ३) | **<u>अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडू</u>**<br>- शासन निर्णय शालेय व शिक्षण विभाग विभागाचे शासन निर्णय दि.०१ जुलै,२०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दिनांक ०१ ऑक्टोबर २०१७ आणि तद्नंतर शासनाने या सदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, प्राविण्य प्राप्त खेळाडूंबाबत आरक्षण, क्रिडा विषयक प्रमाणपत्र पडताळणी वयोमर्यादेतील सवलती संदर्भात कार्यवाही करण्यात येईल.<br>- प्राविण्य प्राप्त खेळाडू आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत :- खेळाडू उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वी सुधारित तरतुदी नुसार विभागीय उप संचालक यांचेकडुन खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे गुणवत्ता खेळाडू उमेदवारांना कागदपत्र पडताळणीच्या वेळी विभागिय उपसंचालक यांनी क्रिडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो या बाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडू साठी आरक्षित पदावर शिफारशीसाठी / नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल.<br>- तसेच आरक्षणासाठी क्रिमिलेअरची अट लागू राहणार नाही.<br>- शासन शुध्दीपत्रक क्रमांक राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रियुसे-२ दिनांक १८.०८.२०१६ मध्ये दिलेल्या तरतुदी नुसार भरती वर्षात त्या-त्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवार उपलब्ध झाले नाही तर सदर आरक्षण इतरत्र अदलाबदल न करता त्या प्रवर्गातील बिगर खेळाडू उमेदवारांमार्फत भरण्याची कार्यवाही करण्यात येईल. |
| <u>४)</u> | **<u>माजी सैनिक</u>**<br>शासन परिपत्र साप्रवि क्र. आरटीए१०७९/४८२/१६-अ दिनांक १६.०४.१९८१ अन्वये माजी सैनिक उमेदवारांना समांतर आरक्षण लागु करण्यात आले आहे. माजी सैनिक उमेदवारांच्या बाबतीत सैन्यात काम केल्या बाबतचे आवश्यक कागदपत्र व जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केले असल्या बाबत प्रमाणपत्र व सेवा तपशील दर्शविणारे अभिलेख प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. तसेच निवड झालेल्या माजी सैनिक उमेदवारांच्या कागदपत्रांची सक्षम अधिकाऱ्यांकडून पडताळणी झाल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही. तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.आरटीए ९०९०/६२/प्र.क्र. २२२/९१/२८ मुंबई दि. ३० डिसेंबर १९९१ अन्वये माजी सैनिकांना शासन सेवेत नागरी सेवेतील पदावर नियुक्तीसाठी देण्यात येणाऱ्या सवलतीचा त्यांनी एकदा फायदा घेतल्यावर नागरी सेवेतील पदावर नेमणुकीसाठी दुसऱ्यांदा तसा फायदा घेता येणार नाही.<br>सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक ०२.०९.१९८३ नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसतांना सैनिक सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येवून त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुंटूंबातील फक्त एका व्यक्तिला नियुक्ती देणेचे धोरण आहे व त्यांचा १५ टक्के समांतर आरक्षणातुन विचार करणेत येईल. |

| | |
|---|---|
| ५) | **प्रकल्पग्रस्त**<br>शासन निर्णय साप्रवि क्र. एईएम१०८०/३५/१६अ दिनांक २१.०१.१९८० नुसार प्रकल्पग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागु करण्यात आलेले आहे. प्रकल्पग्रस्त या समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी संबंधित जिल्हयातील मा. जिल्हाधिकारी/ जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडील प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. |
| ६) | **भुकंपग्रस्त**<br>शासन निर्णय साप्रवि क्र. भुकंप/१००९/प्र.क्र.२०७/२००९/१६अ दिनांक २७.०८.२००९ नुसार भुकंपग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागु करण्यात आलेले आहे. भुकंपग्रस्त या समांतर आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या उमेदवारांनी संबंधित जिल्हयातील मा. जिल्हाधिकारी/ जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडील भुकंपग्रस्त प्रमाणपत्राची मुळ प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. |
| ७) | **अंशकालीन कर्मचारी**<br>शासन निर्णय दि. २७ ऑक्टोंबर २००९ अन्वये पदविधर/पदविकाधारक अंशकालीन या समांतर आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी सुशिक्षीत बेरोजगार या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षे काम केल्याचे सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र व रोजगार मार्गदर्शक केंद्रामध्ये सदर अनुभवाची नोंद केल्याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे व तशी नोंद ऑनलाईन अर्जात नमुद करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र व सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र उमेदवारांना कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. अंशकालीन उमेदवाराने एकदा समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्याच उमेदवारांस पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही, तसे आढळल्यास कोणत्याही वेळी निवड रद्य करण्यात येईल याची नोंद घ्यावी. |
| ८) | **अनाथ**<br>महिला व बालविकास विभागाकडील शासन निर्णय दिनांक ०२.०४.२०१८ अन्वये अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण निश्चित करण्यात आलेले आहे. सदर प्रवर्गातुन जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या पदसंख्ये एवढे उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार इतर उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल.<br>आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी अर्ज सादर करतांना तशी नोंद करणे व कागदपत्र पडताळणीच्या वेळी अनाथ प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. |
| ९) | **सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी)-**<br>सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांकरिता शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : बीसीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दिनांक ७ डिसेंबर २०१८ अन्वये विहित करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. या प्रवर्गातील आरक्षणाचे लाभाकरीता अलिकडील / नविनतम मुळ नॉन क्रिमीलियर प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. |
| १०) | **खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS)**<br>खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (EWS) वर्गातील उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक राआधो-४०९/ प्र.क्र.३१/ १६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये विहित करण्यात आलेले कागदपत्रे/ पुरावा (परिशिष्ट-क) आणि घोषणापत्र (परिशिष्ट- ड) पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराच्या/उमेदवाराच्या कुटुंबाचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु.८ लाखाच्या आत असेल पाहिजे व ती व्यक्ती किंवा तिचे कुटुंबीय महाराष्ट्र राज्यात दि.१३ ऑक्टोंबर १९६७ रोजी किंवा त्यापूर्वीचे रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>**सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय दिनांक १२.०२.२०१९ नुसार खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील उमेदवारांना वय, परीक्षा फी व इतर अनुज्ञेय सवलती ह्या इतर मागास प्रवर्गास राज्य शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या नियमानुसार राहतील.** |

| (१२) इतर सर्वसाधारण सुचना | |
|---|---|
| १) | ज्या उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे, सेवा योजन कार्यालय, समाजकल्याण, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालयात नांवे नोंदविली असली तरी अशा उमेदवारांना विहीत मुदतीत स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे व परिक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील (माजी सैनिकांना परीक्षा शुल्क भरणे आवश्यक नाही) तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन अशा इच्छुक व पात्र उमेदवारांनी देखील भरतीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारांत घेतले जाणार नाहीत. अशा उमेदवारांना कार्यालयामार्फत स्वतंत्रपणे कळविले जाणार नाही. |
| २) | अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालीक, अंशकालीक, विद्यावेतन, अंशदानात्मक, विनावेतन तत्वावर केलेला अंशकालीन सेवेचा कालावधीत सेवेत प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरता येणार नाही. |
| ३) | सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. बीसीसी २०११/प्र.क्र. १०६४/२०११/१६-ब दिनांक १२ डिसेंबर २०११ नुसार मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. शासन निर्णय दिन. १२.१२.२०११ अन्वये निवड यादीत निवड झालेल्या उमेदवारांकडे जात वैधता प्रमाणपत्र नसल्यास ०६ महिन्यांचे आत, जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. विहीत मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधीत उमेदवारांना सेवेतुन कमी करण्यात येईल. |
| ४) | सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील (एसईबीसी) वर्गातील उमेदवारांकरिता शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : बीसीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दिनांक ७ डिसेंबर २०१८ अन्वये विहित करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच, शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाययक विभाग क्रमांक: सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/मावक, दिनांक १५ जुलै २०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासवर्गाकरीता (ईएसबीसी) देण्यात आलेली जात प्रमाणपत्र सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गातील (एसईबीसी) वर्गातील आरक्षणाकरीता ग्राह्य धरण्यात येतील. या प्रवर्गातील आरक्षणाचे लाभाकरीता अलिकडील / नविनतम मुळ नॉन क्रिमीलियर प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. |
| ५) | वि.जा.(अ)/भ.ज.(ब)/भ.ज.(क)/भ.ज.(ड)/वि.मा.प्र., इमाव, एसईबीसी व ईडब्ल्युएस या प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी तसेच महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिनाऱ्या खुल्या प्रवर्गातील महिला उमेदवारांनी उन्नत आणि प्रगत व्यक्ती व गट (क्रिमीलियर) या मध्ये मोडत नसल्या बाबतचे सक्षम अधिकाऱ्याने दिलेले अलिकडील / नविनतम मुळ नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांका पर्यंत प्राप्त करणे आवश्यक राहील. सदर प्रमाणपत्राची पडताळणी कागदपत्र तपासणीच्या वेळी करण्यात येईल. |
| ६) | शासकीय /निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या संबंधित नियुक्ती प्राधिकरणाच्या परवानगीने भरावयाचा आहे. अशी परवानगी प्राप्त केल्याची प्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवाराकडे असणे आवश्यक आहे. |
| ७) | ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे पात्रता परिक्षेस बसण्याचा/कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास किंवा खोटी माहिती पुरविल्यास अथवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन बाद करण्यात येईल. |
| ८) | निवड प्रक्रिया सुरू झाल्या नंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारानी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती बाद करण्यात येईल, व शासनाची दिशाभुल केल्या प्रकरणी सदर उमेदवारा विरूध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| **९)** | चारित्र्य-पुर्वचारित्र्य पडताळणी अंती अक्षेपार्ह बाबी आढळून असल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी/सेवेसाठी पात्र राहाणार नाही. तसेच कोणत्याही टप्प्यावर असे उमेदवार अपात्र ठरतील. |
| **१०)** | निवड झालेल्या उमेदवारांनी आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्र/हमीपत्र इत्यादींची पुर्तता करून देणे आवश्यक राहील. तसेच त्या प्रमाणपत्रांची पडताळणी विहित पध्दतीनुसार करून घेणे बंधनकारक राहील. सेवेत नियुक्त होणाऱ्या उमेदवारांना नियमानुसार आवश्यक ती सेवाप्रवेशोत्तर परीक्षा/प्रशिक्षण विहित मुदतीत उत्तीर्ण/पुर्ण करणे आवश्यक राहील. |
| **११)** | अपरिहार्य कारणास्तव किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा शासन आदेशाने विहित दिनांकास पात्रता परीक्षा/ऑनलाईन परिक्षा घेणे शक्य नसेल तर शासन ठरवून देईल त्या प्रमाणे सोईच्या दिवशी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येईल. या बाबत उमेदवारांना एस.एम.एस., ई-मेल, व संकेतस्थळाव्दारे कळविण्याची जबाबदारी महा आय.टी. यांची तर वर्तमानपत्रातुन कळविण्याची जबाबदारी नियुक्ती प्राधिकारी/संबंधित जिल्हा परिषद यांची राहिल. |
| **१२)** | **ऑनलाईनपरिक्षेस** कागदपत्र पडताळणीस उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. |
| **१३)** | निवड झालेल्या उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करण्यात येईल. वैद्यकीय अहवाल प्रतिकुल असल्यास केलेली निवड व नेमणुक रद्य करण्यात येईल. |
| **१४)** | वरील अटी व शर्ती नियमाव्यतिरिक्त शासनाने वेळोवेळो निर्गमित केलेले आदेश व निर्णय लागू राहील. |
| **१५)** | जाहिराती मधील काही मुद्ये शासन निणर्याच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील. |
| **१६)** | **समानगुण आणि आत्महत्याग्रस्त शेतक-याचे पाल्य :- उमेदवारांना समान गुण मिळाल्यास उमेदवारांची गुणवत्ता यादीतील प्राधान्यक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रनिमं-१२१६/प्र.क्र.६५/१६/१३-अ, दिनांक १३ जून, २०१८ मधील तरतुदीनुसार निश्चित करणेत येईल. यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकाऱ्यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य राहील.** |
| १७) | शासन सामान्य प्रशासन विभाग पुरकपत्र क्र.प्रानिमं-२०१७/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ, दिनांक ५.१०.२०१५ मधिल तरतुदी नुसार परीक्षमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवरांचा गुणवत्ता यादीत समावेश करतांना आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्य देण्याचा शासनाच्या धारणानुसार अशा उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी संबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास कुटूंबातील मृत शेतक-याचा पाल्य म्हणुन पात्र ठरविण्या बाबतचा पुरावा सांक्षाकित प्रतिसह कागदपत्र छाननीच्या वेळी पडताळणी समितीस उमेदवाराने उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. |
| **१)** | पात्रता परीक्षा व कागदपत्र पडताळणीसाठी येण्या-जाण्यासाठी येणारा खर्च उमेदवारास स्वत: करावा लागेल. |
| **२)** | फक्त पेन, पेन्सिल, प्रवेशपत्र, ओळखीचा मुळ पुरावा व त्याची छायांकित प्रत अथवा प्रवेशपत्रावरील सुचनेनुसार परवानगी दिलेल्या साहित्यासह उमेदवाराला परीक्षा कक्षात प्रवेश देण्यात येईल. |
| ३) | डिजीटल डायरी, पेजर, मायक्रोफोन, मोबाईल फोन, कॅमेरा अंर्तभुत असलेली कोणत्याही प्रकारची साधने, सिमकार्ड ब्ल्यू टूथ, दूरसंचार साधने म्हणून वापरण्या योग्य कोणतीही वस्तु इलेक्ट्रानिक उपकरणे, वहया, नोटस, परावानगी नसेलली पुस्तके, बॅग्ज, परिगणक (Calculator) इत्यादी प्रकारची साधने/साहित्य परीक्षा केंद्राच्या परिसरात तसेच परीक्षा कक्षात आणण्यास, स्वत:जवळ बाळगण्यास, त्याचा वापर करण्यास अथवा त्याच्या वापरासाठी इतरांची मदत घेण्यास सक्त मनाई आहे. असे साहित्य आणल्यास ते परीक्षा केंद्राबाहेर ठेवण्याची व त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. |
| ४) | परवानगी नाकारलेल्या कोणत्याही प्रकारचे अनाधिकृत साधन/साहित्य परीक्षेच्यावेळी संबंधित उपकेंद्राच्या मुख्य प्रवेशव्दारावरच ठेवावे लागेल. अशा साधन /साहित्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. या संदर्भातील कोणत्याही प्रकारच्या नुकसानीस महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद प्रशासन किंवा परीक्षा केंद्र व्यवस्थापन जबाबदार राहणार नाही. |

**स्वाक्षरीत/-**

मुख्य कार्यकारी अधिकारी,

जि.प.औरंगाबाद